# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

प्रसिद्धी पत्रक ता. २ मार्च २०१९

# नागपूर महानगरपालिकेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## बॅरी. वानखेडे यांच्या पुतळ्याला पालकमंत्री व महापौरांनी केले अभिवादन

**नागपूर, ता. २ :** नागपूर महानगरपालिकेचा वर्धापन दिन शनिवारी (ता.२) उत्साहात साजरा करण्यात आला. नागपूर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त मनपा मुख्यालयातील हिरवळीवर असलेल्या प्रथम महापौर बॅरी. शेषराव वानखेडे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार यांच्यासह मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार सुधाकर कोहळे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अभिजीत बांगर, माजी महापौर प्रवीण दटके, जलप्रदाय समिती विजय झलके, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, गलिच्छ वस्ती सुधार समितीचे सभापती अभय गोटेकर, ज्येष्ठ नगरसेवक प्रदीप पोहाणे, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, नगरसेविका रूपा रॉय, मंगला गवरे, नगरसेवक अमर बागडे, सुनील हिरणवार, महेंद्र धनविजय, भगवान मेंढे, राजेंद्र सोनकुसरे, संजय महाजन, दिपक चौधरी, संदीप गवई, किशोर जिचकार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी,

मुख्य अभियंता उल्हास दाबेडवार, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, निगम सचिव हरीश दुबे, सहायक आयुक्त महेश धामेचा, सहायक आयुक्त महेश मोरोणे, सहायक आयुक्त राजु भिवगडे, सुभाष जयदेव यांच्यासह मनपाचे पदाधिकारी, अधिकारी व बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते.

दोन मार्च १९५१ रोजी नागपूर महानगरपालिकेची स्थापना झाली. आज नागपूर महानगरपालिकेला ६८ वर्ष झाली. ६८वा वर्धापन दिन उत्साहात मनपा मुख्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाचे संचालन व आभार जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले.